

# मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनचा 'एन्व्हायन्मेंट इनिशिएटिव्ह'ने सन्मान

**मुंबई:** भुयार आणि भूमिगत बांधकामातील सर्वात अद्वितीय नवकल्पना आणि उत्कृष्ट प्रकल्पांना दिला जाणारा पुरस्कार मेट्रो -३ प्रकल्प राबवणाऱ्या मुंबई मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनला मिळाला आहे.

टी.ए.आय. टनेलिंग अँड अंडरग्राऊंड स्पेस अवॉर्ड्स २०२२ समारंभात कॉर्पोरेशनला एन्व्हायन्मेंट इनिशिएटिव्ह ऑफ द ईयर या पुरस्काराने गौरवण्यात आले. हाती घेतलेल्या कामाचे जेव्हा कौतुक होते तेव्हा स्फूर्ती मिळते. कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो- ३ मार्ग हा एम.आर.टी.एस. प्रकल्प आहे. वाहनांमधून जाणारे प्रवासी मेट्रोकडे वळल्यामुळे हरितगृह वायू उत्सर्जन कमी होईल. मेट्रोमुळे रस्त्यांवरील वाहतूक कोंडी आणखी कमी करणे, शहराचे पर्यावरण सुधारणे, प्रदूषण कमी करणे, कनेक्टिव्हिटी आणि दळणवळण सुधारणे हे या प्रकल्पाचे उद्दिष्ट आहे.